# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३**

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: व्ही-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४२५, सहकार**<br>**बाब क्रमांक: ९०, रूपये:- २,२०,९६,२६,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (१) | ४८५० | १० | "महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्यादित, मुंबई मधील कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला असणे, तथापि सहकार विभागातील पदोन्नत्या रखडल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये पसरलेली नाराजीची भावना, परिणामी आयुक्तालयावर कामाचा अतोनात ताण पडत असणे, असे असताना पदोन्नतीच्या प्रस्तावावर मंत्रालयीन विभागांनी कोणतीही कारवाई केलेली नसणे, सहकार खात्यात अपर आयुक्त व इतर दोन पदे गेली काही महिने रिक्त असणे, अतिरिक्त पदभार देऊन हे काम सुरू ठेवण्यात येत असल्यामुळे राज्यातील कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, यासंदर्भात तातडीने निर्णय निघण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: व्ही-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४२५, सहकार**<br>**बाब क्रमांक: ९६, रूपये:- १०,१४,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (२) | ४८३९ | १० | महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमाफी योजने अंतर्गत नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना 50हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची घोषणा राज्य शासनाने केली होती,बुलढाणा जिल्ह्यातील 18 हजार 785 शेतकरी योजनेसाठी पात्र असून त्यापैकी केवळ 2 हजार 736 शेतकऱ्यांनाच प्रोत्साहन अनुदानाचा लाभ मिळाला असून 16 हजार पेक्षा जास्त शेतकरी वंचित आहेत अनुदानाच्या लाभांपासून वंचित असलेले शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतीक्रीया. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अजित पवार** |
| (३) | ४८५२ | १० | "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना 2019 अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय आघाडी सरकारने घेतल्यानंतर विद्यमान सरकारने त्यासाठी आर्थिक तरतूद केलेली असणे, तथापि राज्यातील छोट्या मोठ्या उद्योगांना भरभक्कम पतपुरवठा करणाऱ्या बँका दुसऱ्या बाजूला कृषी कर्ज देत नसल्याची बाब उघडकीस येणे, विशेषतः कृषी क्षेत्रातील पायाभूत कामासाठी पतपुरवठा सुधारा अशा शब्दांमध्ये रिझर्व बँक राष्ट्रीयकृत बँकांना वारंवार सांगत असणे, परंतु त्यानुसार बँका कृषी कर्ज देण्यास पिछाडीवर असणे, छोट्या व मध्यम उद्योगांना चालू वित्तीय वर्षात 2.84 लाख कोटी रुपयांची कर्ज वाटण्याची उद्दिष्ट असताना सप्टेंबर 2022 पर्यंत 1.77 लाख कोटी रुपयांची कर्जे वाटत उद्योगांच्या कर्ज वाटपात बँकांनी आघाडी घेतलेली असताना मात्र कृषी क्षेत्रासाठी चालू आर्थिक वर्षात 1.26 लाख कोटी रुपयांची कर्जे वाटण्याचे उद्दिष्ट दिले असता सप्टेंबर 2022 पर्यंत केवळ 73 हजार कोटी रुपयांची कर्जे वाटलेली असणे, यासंदर्भात शासनाने एसएलबीसी इत्यादी बैठकांच्या माध्यमातून कृषी कर्ज वाटपात आघाडी घेण्यासाठी बँकांकडे पाठपुरावा करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (४) | ४८४३ | १० | महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहानपर लाभ योजना (राज्यस्तर) अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी कर्जमाफीपासून वंचित आहेत , संबधीत शेतकरी वारंवार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे वारंवार माहिती मागत आहेत परंतु सदर कर्जमाफीची ऑनलाईन पोर्टल बंद असल्याने मोठ्या प्रमाणात शेतकरी कर्जमाफीपासून वंचित असल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (५) | ४७६२ | १० | शासनाने सन २०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेनुसार फक्त १.५० लाख पर्यंत कर्ज माफ केले, मात्र अनेक शेतकऱ्यांना सदरच्या योजनेचा लाभ झाला नसणे, सुमारे ८८,८४१ कर्ज खाती शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ याय योजनेअंतर्गत लाभास पात्र ठरले असणे, तथापि, सदरची कर्ज खाती महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजना २०१९ अंतर्गत लाभास अपात्र ठरली असणे, सदरचे कर्ज त्यांना कर्ज माफ झाली नसणे, सदरच्या योजनेचा लाभ अद्याप प्रदान करण्यात आला नसणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: व्ही-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग**<br>**बाब क्रमांक: ९८, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (६) | ४८४० | १० | माझ्या मतदार संघातील मलकापूर व नांदूरा तालुक्यात मध्ये कापूस या पिकाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. मलकापूर तालुक्यामध्ये प्रतिवर्षी २० हजार हेक्टर क्षेत्रामध्ये कापसाचा पेरा होत असून त्यातून २,७७,८६१ क्विंटल कापूस उत्पादन केले जाते. तसेच नांदूरा तालुक्यामध्ये प्रतिवर्षी अंदाजे २०,००० फॅक्टर कापसाचा पेरा होत असून त्यामधून ३,लाख ,३५० क्विंटल कापूस उगवला जातो. मलकापूर तालुक्यामधील २,७७,८६१ क्विंटल कापूस उत्पादन वितिरिक्त ३,१२,४२४ क्विंटल कापसाची आवक कृषी उत्पन्न बाजार समिती, मलकापूर मध्ये आहे. तर नांदूरा तालूक्या मधील एकूण कापूस उत्पादन पैकी सीसीआय मार्फत फक्त ९९,३५८ क्विटल कापूस खरेदी केला गेला व उर्वरित संपूर्ण कापूस व्यापारी खाजगी कंपनी मार्फत खरेदी केला गेला. माझ्या मलकापूर विधानसभा मतदारसंघ अंतर्गत मलकापूर व नांदूरा तालुक्यामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन होऊन देखील कोणताही ठोस प्रोजेक्ट अथवा कापूस उत्पादन त्या पासून रुई तयार करणे, रुई पासून धागा व धाग्या पासून कपडा अशी प्रक्रिया करणारे उद्योग नसल्याने शेतकऱ्यांना आपला कापूस इतर ठिकाणी विकावा लागतो. करिता उपरोक्त संपुर्ण बाबींचा विचार करून मलकापूर विधानसभा मतदारसंघातील मोठ्या प्रमाणात उत्पादित होणारा कापूस लक्षात घेता मलकापूर येथे टेक्स्टाईल पार्क मंजूर करण्यात यावा. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (७) | ४८४२ | १० | ''संत गाडगेबाबा सहकारी सुतगीरणी मर्या. दर्यापूर जि. अमरावती या सुतगीरणीची नोंदणी दिनांक ०९/०४/१९८१ रोजी करण्यात आली असून सदर सुतगीरणी सुरळीत सुरू असताना सन २००७ मध्ये सुतगीरणीचा राज्य सहकारी बँकेच्या थकीत रकमेचा सुतगीरणीने भरणा न केल्याने केल्याने गिरणीची मशीनरी जप्त केलेली आहे , सदर सुतगीरणीकडे स्वमालकीची एकूण ६०.१३ हे आर जमीनी पैकी ३० एकर शेतजमीन असून उर्वरीत जमीनीवर सुतगीरणीची इमारत व मशीनरी असून सदर सुतगीरणी सुरू असताना अंदाजे ८०० कामगार कार्यरत होते , सदर सूतगीरणी बंद झाल्याने मोठ्यां प्रमाणावर कामगार बेरोजगार होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे सदर सुतगीरणी पूर्ववत सुरू करण्याबाबत निरंतर मागणी होत असणे , सदर सुतगीरणी पूर्ववत सुरू करण्याबाबत मा. अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली , मा सहकार मंत्री , मा वस्त्रोद्योग राज्यमंत्री , अपर मुख्य सचिव वित्त विभाग , प्रधान सचिव सहकार , व्यवस्थाओयकीय संचालक , महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांच्या प्रमुख |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | उपस्थितीत दिनांक २१/१०/२०२० रोजी आढावा बैठक आयोजीत करण्यात आलेली होती , तद्नंतर मा मंत्री वस्त्रोद्योग यांच्या अध्यक्षतेखाली १०/०८ /२०२१ रोजी आढावा बैठक आयोजीत करण्यात आली असून सदर बैठकीत पूर्ववत सुरू करण्याकरीता तांत्रिक व आर्थिक निकषानुसार व्यवहार्यता तसेच या प्रकरणातील वैधानिक अडचणीबाबत संबंधीत क्षेत्रातील तज्ञांकडून तपासून घेऊन अहवाल सादर करण्याचे आदेशीत केलेले होते , परंतु अद्यापपर्यंत सदर प्रकरणी कोणतेही कार्यवाही करण्यात आलेली नाही , यामुळे स्थानिक कामगारांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई